महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५३ वा | दिनांक : ०७/१२/२०२५ | वार : रविवार

## देवाभाऊ त्यांचे आदर्श असतील तर त्यांची पूजा करावी - संजय शिरसाट



**मुंबई** : राज्याच्या राजकारणात महायुती स्थापन झाल्यानंतर सर्व काही स्थिर होईल, अशी अपेक्षा होती. मात्र अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मित्रपक्ष एकमेकांसमोर उभे राहिल्यामुळे महायुतीत मोठा दुरावा असल्याचे चित्र समोर आले. त्या पार्श्वभूमीवर आता मुंबईच्या महापौरपदावरून मंत्री मंगलप्रभात लोढा आणि शिंदे गटाच्या नेत्यांमध्ये शब्दीक खडाजंगीची नवी लाट उसळली आहे. लोढा यांनी एका कार्यक्रमात महापौरपद भाजपकडे येणार असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला आणि त्यावेळी देवाभाऊ शपथ देण्यासाठी येतील असे वक्तव्य केले. यामुळे शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांना रोखठोक प्रतिक्रिया द्यावी लागली आणि महायुतीतील तणाव पुन्हा एकदा सर्वांसमोर आला. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा वाद अधिकच गडद होताना दिसत आहे.

संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, मुंबईचा महापौर महायुतीचाच असावा, या भूमिकेवर ते ठाम आहेत. मात्र फक्त भाजपचाच महापौर होणार, असे सतत बोलून वातावरण बिघडवण्याची जबाबदारी काही जण घेत असल्याचे त्यांनी सूचित केले. देवाभाऊ हे त्यांचे आदर्श असतील तर त्यांनी त्यांची पूजा करावी, असा उपरोधिक टोला त्यांनी लोढांना लगावला आणि प्रत्येकवेळी प्रतिक्रिया द्यावी लागल्यामुळे बेबनाव असल्याचे चित्र तयार केले जाते, याबद्दल नाराजीही व्यक्त केली. महायुतीचे बंध मजबूत ठेवणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, मुंबईचा महापौर महायुतीचाच झाल्यास कॉलर टाईट होईल, एकट्या भाजपचा नव्हे. त्यामुळे शिरसाट यांच्या या प्रतिक्रियेमुळे सत्ताधारी युतीमधील अंतर्गत मतभेद उघडे पडले आहेत.

याच पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या प्रतिक्रियेचा संदर्भही शिरसाट यांनी मांडला. चव्हाण यांनी आपले मागील वक्तव्य बदलल्याचे त्यांनी सांगितले आणि त्यामुळे आता त्या वादाचा मुद्दा मिटल्याचेही मत व्यक्त केले. तसेच येणाऱ्या अधिवेशनात महायुतीतील प्रमुख नेत्यांची बैठक होणार असून, त्यानंतरच पुढील रणनीती ठरवली जाईल, असे त्यांनी सांगितले. एकत्र निवडणूक लढवणे हीच महायुतीच्या राजकीय गणितातील सर्वात मोठी अट असल्याचे त्यांनी नमूद केले. अन्यथा मतविभाजनामुळे महाविकास आघाडीला फायदा होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## माझ्यात अन् खैरेंमध्ये वाद नाही - अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर** : माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी काल मातोश्रीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. याच पार्श्वभूमीवर, ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज मोठे विधान केले आहे.

माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी जाधव यांच्या संभाव्य पक्षप्रवेशाला विरोध दर्शवला असताना, दानवे यांनी स्पष्ट केले की, खैरे आणि माझ्यात काहीही वाद नाही. त्यांना त्यांचे मत मांडण्याचा अधिकार आहे. परंतु खैरे यांच्या मतापेक्षा उद्धव ठाकरेंचा विचार माझ्यासाठी महत्त्वाचा आहे.

हर्षवर्धन जाधव यांच्या ठाकरे गटातील प्रवेशाबद्दलच्या चर्चांवर बोलताना अंबादास दानवे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. मी माझ्या मनाने काहीही गोष्ट करत नाही. उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने आणि मार्गदर्शनाने काम करतो. पक्षात कुणाला घ्यायचे आणि नाही, हा निर्णय मी घेऊ शकत नाही. उद्धव ठाकरेंच्या आदेशाची अंमलबजावणी करणे माझे काम आहे आणि मी तेवढेच काम करतो, असे म्हणत त्यांनी जाधव यांच्या संभाव्य प्रवेशाचा निर्णय पूर्णपणे उद्धव ठाकरे यांच्या हातात असल्याचे संकेत दिले.

मतचोरी ही देशभरातील सर्वात मोठी चोरी आहे. मी टाकलेले मतच जर चोरी होत असेल निवडणूक आयोगाच्या माध्यमातून सत्ताधारी पक्षाला मदत होत असेल तर आवाज उठवावा लागेल. कुणीही पुढाकार घेतला तरी त्यामध्ये सर्वांनी सहभागी होणं गरजेचे आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, हापूस आंबा हा आपला आहे हे सांगण्याची गरज नाही. जगभरात त्याला मागणी आहे. हापूस आंबा महाराष्ट्रासह देशाची शान आहे. गुजरातचा हापूस हे काही तरी नवीन सुरू होत आहे. मुख्यमंत्री असताना पालकमंत्र्यांनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. पण शिष्टाचाराचे पालन होत नाही हे छत्रपती संभाजीनगरात दिसून येत आहे.

## ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव आयसीयूमध्ये : शरद पवारांनी घेतली प्रकृतीची माहिती



**पुणे** : राज्यातील नामवंत समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना पुण्यातील पुना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. गेल्या दहा दिवसांपासून त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले असून त्यांच्या प्रकृतीत चढ-उतार होत आहेत. त्यामुळे त्यांच्या समर्थकांसह समाजात मोठी चिंता निर्माण झाली आहे.

आढाव यांची तब्येत खालावल्याची माहिती मिळाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार स्वतः रुग्णालयात पोहोचले. त्यांनी वैद्यकीय पथकाकडून संपूर्ण माहिती जाणून घेतली तसेच परिवाराशी देखील संवाद साधून धीर दिला. पवारांनी डॉक्टरांशी चर्चा करत उपचाराची प्रगती तपासली आणि गरज भासल्यास अधिक मदत करण्याचे आश्वासन दिले.

डॉक्टरांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हृदयाशी संबंधित समस्येमुळे त्यांना रुग्णालयात भरती करण्यात आले. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य आणि त्यांच्या टीमकडून आवश्यक उपचार चालू आहेत. नातेवाईकांनी सांगितले की, प्रकृती गंभीर असली तरी आत्ता ती स्थिर आहे. डॉक्टर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. काही वेळापूर्वी अचानक प्रकृती खालावल्याने त्यांना अधिक काळजीपूर्वक निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे.

बाबा आढावांच्या कुटुंबीयांनी जनतेला एक महत्वाची विनंती केली आहे. त्यांनी सांगितले, कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरवू नयेत. चुकीच्या माहितीमुळे गैरसमज निर्माण होतात. म्हणून केवळ कुटुंबीयांकडून किंवा अधिकृत सूत्रांकडून मिळणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवावा. तसेच बाबा आढाव यांच्या आरोग्याविषयी घडामोडी योग्य वेळी जनतेपर्यंत पोहोचवल्या जातील, असेही स्पष्ट केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ डिसेंबर २०२५


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात प्रा. डॉ. प्रमोद जायभाये यांचे व्याख्यान संपन्न




**जालना** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले प्रस्थापित विषमतावादी मूल्याना नकार देऊन समतामुलक समाज येथे निर्माण झाला पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. आयुष्यभर त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. लोकजागृती करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हे गरजेचे आहे आणि त्यासाठी त्यांनी शिक्षणावर अधिक भर दिला. त्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. शिक्षणाशिवाय समाज शहाणा होणार नाही ही जाणीव त्यांना होती. शिक्षणामुळे आज खरंच आपण प्रबुद्ध झालो आहोत का हा खरा प्रश्न आहे? अलीकडे या विचारांचा आपणा सर्वांना विसर पडत आहे ही खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी बाबासाहेबांचे विचार हे दीपस्तंभाप्रमाणे आहेत. त्यांचे शिक्षण विषयक विचार हे मूलगामी परिवर्तनासाठी महत्त्वाचे असून शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. ज्ञान संपादन करणं हेच आपल्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. आदर्श नैतिक मूल्यांचा प्रामाणिकपणे आपण अवलंब केला पाहिजे. बाबासाहेब आयुष्यभर विद्यार्थी म्हणून जगले. शिक्षणासाठी त्यांनी कुठलीही तडजोड स्वीकारली नाही, ज्ञान संपादन केल्यामुळेच ते आज साऱ्या जगभर पोहोचले. ज्ञान आणि त्याला नैतिक कृतीची जोड दिल्याने साऱ्या जगाची ते दीपस्तंभ बनले आहे. शिक्षकाने कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता सर्वांशी समानतेने वागले पाहिजे. ज्ञान संपादनाचा आग्रह त्याने धरला पाहिजे. स्वतः वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून तो त्याने विद्यार्थ्यांमध्ये रुजवला पाहिजे. आदर्श चारित्र्याचा अंगीकार करून त्यांने आपली भूमिका बजावली पाहिजे असेही ते म्हणाले.प्राचार्य कविता प्राशर म्हणाल्या की, बाबासाहेबांनी नेहमी धर्मनिरपेक्षतेचा आग्रह धरला. त्यांचे विचार आपणा सर्वांना पुढे घेऊन जाणारे आहेत. आपण सर्व त्यांचे ऋणी आहोत. यावेळी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रियदर्शन भवरे यांनी केले.

## जे. ई. एस. महाविद्यालय जालनात डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे ई एस महाविद्यालय जालना येथे महापरिनिर्वाण दिवस साजरा करण्यात आला, यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड ,राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. योगेश लहमाटे ,प्रा. किशोर तापडिया तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कालिकादेवीमध्ये महामानवाला अभिवादन




**शिरूर कासार** : दि.०६ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि. बीड येथे आधुनिक भारताचे निर्माते तथा भारतीय संविधानाचे शिल्पकार 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब,ज्येष्ठ नगरसेवक अर्जुन(दादा) गाडेकर, ज्येष्ठ नेते गोविंद(काका)पाटील गाडेकर,नगरसेवक डॉ.भगवानराव सानप,माजी सभापती सतीश काटे,गटनेते गणेश भांडेकर,पत्रकार गोकुळ पवार,सतीश केदार यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून,'भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान तयार करत असताना राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष पद स्वीकारून त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राज्यघटना ही ३९५ कलमे आणि सतरा परिशिष्टे अशी विस्तृत आणि जगातील सर्वात मोठी राज्यघटना तयार करण्यामध्ये डॉ.बाबासाहेबांचे खूप मोठे योगदान आहे.त्यांचे हे योगदान आपण कधीच विसरू शकत नाहीत.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आपल्या देशावर अनंत उपकार आहेत.त्यांच्या संविधानावरच आपल्या देशाची वाटचाल सुरू आहे.असा मौलिक विचार त्यांनी आपल्या भाषणातून मांडला.यानंतर पत्रकार गोकुळ पवार,यांनीही आपल्या भाषणातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला आणि विनम्र अभिवादन केले.त्याचप्रमाणे विद्यार्थी वक्ते चि.शोएब आतार याने आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.नारायण घोलप,प्रा. नामदेव तरकसे, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा.अनिल जरे,प्रा.दत्ता शिंदे, प्रा. बिभिषण घायाळ,प्रा. महादेव हांगे,प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे,प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.दत्ता गायकवाड, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा.सुनिल मोरे,प्रा.घनश्याम चव्हाण, डॉ. अशोक घोडके,प्रा. अशोक सवासे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा. हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सिमा ढवळे, सौ.अनिता लाटे,रविंद्र बडे,वसंत आहेर, बाळासाहेब येवले, आप्पासाहेब कांबळे,राजू बडे, जयेंद्र निकम,प्रकाश राऊत, नितीन बहिर,रोहित शिराळे, अदिनाथ काशिद,सुनिल खेडकर, विलास कांबळे,चव्हाण सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी विनम्र अभिवादन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आत्माराम झिंजुर्डे यांनी केले तर आभार प्रदर्शन विनोद गलांडे यांनी केले.या कार्यक्रमाला विद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ डिसेंबर २०२५


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निबंध लेखनातून अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित निबंध लेखनचा उपक्रम घेऊन अभिवादन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागांतर्गत महात्मा फुले स्मृतिदिन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित "म. फुले , राजर्षी शाहूमहाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती व शेतकरी विषयक विचार" या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धे बाबत प्रास्ताविक व निबंध लेखन नियमावली कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ.नवनाथ गोरे यांनी सांगितले , यावेळी उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी निबंधलेखक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी माहिती देत विद्यार्थ्यांना निबंध लेखनातील विषय , आकलन , विवेचन स्पष्टीकरण दृष्टांत, उदाहरणे , संदर्भ, तालिका , सारणी , अंकातील टक्केवारी अशी विश्वासार्हता संपादित करत भाषाशैलीचे महत्व पटवून दिले. निबंध स्पर्धेचे मुल्यांकन डॉ. गौतम घाडगे यांनी केले.स्पर्धेत गुणानुक्रमे प्रथम-वर्षा प्रदीप आठवले बीए द्वितीय वर्ष, द्वितीय क्रमांक- राशी अजय पंडित बारावी वाणिज्य, तृतीय क्रमांक - प्राची अविनाश काळे अकरावी कला , तर उत्तेजनार्थ बक्षीसे सविता संतोष कैलकर बीका◌ॅम द्वितीय, ज्योती दादासाहेब मनोहर बीए द्वितीय, कुमार किशोर प्रधान बीकॉम तृतीय वर्ष यांनी पटकावले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली , यावेळी प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के यांनी निबंध लेखनात वाचन , चिंतन व बहुश्रूतपणा किती आवश्यक आहे यांची विस्ताराने माहिती दिली . यावेळी जातीसंस्थांचे उच्चाटन याविषयी महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील लेखनावर प्रकाश टाकत वैचारिक निबंध लेखनाची महाराष्ट्रातील परंपरा विद्यार्थ्यांनी आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी डॉ.एस पी खिल्लारे, डॉ.बी.एन शिंदे, डॉ.एस.पी.बुधवंत, डॉ. व्ही जी पिंगळे, डॉ. राहूल मोरे यांची विशेष उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे नियोजन डॉ.नवनाथ गोरे यांनी तर आभार डॉ. व्ही जी पिंगळे यांनी व्यक्त केले.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयात उद्योजकता विकास क्लबचा शुभारंभ



**उमरगा :** महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत उद्योजकता विकास क्लबचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, नवनिर्मिती आणि उद्योजकतेची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.या प्रसंगी प्राचार्य डॉ. अस्वले यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी, कौशल्य, विकास आणि नव्या रोजगार क्षेत्रांविषयी मार्गदर्शन केले. उद्योजकतेद्वारे आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी उद्योजकता विकास क्लबचा अध्यक्ष प्रसाद ममाळे यांनी उद्योजकता क्लब स्थापन्यामागची भूमिका व क्लब मधील सदस्यांनी करावयाची कार्यप्रणाली स्पष्ट केली. क्लब मधील सदस्य -सुशील सूर्यवंशी (सदस्य), कु.रत्नावली बेरड (सदस्य), कु.निशिगंधा पाटील (सदस्य) नसरुद्दीन खान (सदस्य), प्रणव पोतदार (सदस्य), अजय इटकर (सदस्य ), कु.स्नेहा मुळे (सदस्य ),कु.आरती सोनकांबळे (सदस्य), कु. श्रुती पांचाळ (सदस्य)- या सर्वांचे प्राचार्य यांनी स्वागत करून त्यांना क्लब मध्ये करावयाची कार्य याविषयी मार्गदर्शन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. करियर कट्टाअंतर्गत दिल्ली दौऱ्यासाठी निवड झालेल्या कु. आनीषा सुरवसे हिने दिल्ली दौऱ्यात आलेले अनुभव उपस्थित विद्यार्थ्यांना सांगून ही संधी फक्त करिअर कट्ट्यामुळे मिळाली अशी भावना तिने यावेळी व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे,उपप्राचार्य पद्माकर पिठले, आय. क्यू.ए.सी समन्वयक प्रा.डॉ. विनोद देवरकर, प्रा. डॉ. भरत शेळके, करियर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले प्रा. डॉ. चंद्रसेन करे तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक , इतर महाविद्यालयातील प्राध्यापक व करियर संसदेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैष्णवी जमादार तर आभार सुशील सूर्यवंशी यांनी मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेमध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रभाकर पुंजाबा शिंदे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना भारद्वाज यांनी केले आभार प्रदर्शन जाहेद खान पठाण यांनी मानले कार्यक्रमास श्रीमती मनीषा शिंदे, अरुणा फुलंब्रीकर, अनुजा भीगोले, बालवाडी शिक्षिका कवठेकर सर्जेराव वाघ, संजय मडके, मंगल तारो, सुनिता साबळे हे शिक्षक उपस्थित होते विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर भाषण केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ डिसेंबर २०२५


## जि. प. स्पेशल प्राथमिक शाळा मुरुम येथे महापरिनिर्वाण दिन साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जि प स्पेशल प्राथमिक शाळा मुरुम येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. महात्मा फुले पुण्यतिथी व महापरिनिर्वाण दिनानिमित्त बालसभाचे आयोजन करण्यात आले. इयत्ता सहावी विद्यार्थी बालसभेत सहभागी होऊन अध्यक्षपदी विश्वजीत गायकवाड होते. विचारांची देवाणघेवाण करुन आपली मते प्रभावीपणे मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे होते. प्रमुख अतिथी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निर्मलकुमार लिमये, रुपचंद ख्याडे, शिवाजी गायकवाड, अंगद थिटे, आशालता शिवकर आदि उपस्थित होते. याप्रसंगी निर्मलकुमार लिमये, रुपचंद ख्याडे, प्रमिला तुपेरे मनोगत व्यक्त केले. शिवाजी गायकवाड यांनी गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हर्षदा कांबळे सूत्रसंचालन कनिष्का किरात व आभार चैतन्य भालेराव यांनी मानले.

## डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेतील दलीत चळवळ मंदावली- प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने श्रीकृष्ण महाविद्यालयात महापरिनिर्वाण दीन आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यकक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.भाऊसाहेब उगले व डॉ.उमाकांत सूर्यवंशी हे होते.ते पुढे म्हणाले की,"डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत आणि भारतीय समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाचे रान केले.सुशिक्षित लोकांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या.जे शिकले सावरले त्यांनी आपल्याच समाजाला विसरले. डॉ.आंबेडकरानंतर चळवळीला जी गती यायला हवी होती.ती मिळाली नाही.ज्या संघर्षातून हा समतेचा रथ मी इथपर्यंत आणला आहे,तो आणखी पुढे घेऊन जा ,किमान याला मागे तरी घेऊन जाऊ नका ही माफक अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.ती सुद्धा अनुयायांना नीटपणे पार पाडता आली नाही,असे दिसते.बाबासाहेबांनी ज्या लोकांना शिक्षणासाठी बाहेर पाठवले त्यांनी सुद्धा आपापल्या दैनंदिन व्यवहारात व्यस्त झाले.एकूणच आज आंबेडकरी चळवळीचा लेखजोगा पाहता दलीत चळवळ निष्प्रभ होऊन मंदावली आहे.हे चळवळीचे दुर्दैव आहे.असे सांगून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी आपली सर्वांची जबाबदारी आहे.ती आपण प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे.अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंवर भाष्य केले,आणि बाबासाहेबांचा आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे.त्यांची विद्येची भूक अफाट होती त्यापासून सर्व विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.त्यानंतर परित्राण गाथा झाली.या महापरिनिर्वाणदिनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.बालाजी कोनाळे यांनी केले तर आभार प्रा.आर.एन.निगडे यांनी मानले.कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयामध्ये एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमातून डॉ. आंबेडकरांच्या अलौकिक कार्याला आदरांजली वाहण्यात आली आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञाननिष्ठा व सामाजिक जाणिवेचे बीजारोपण करण्यात आले.

कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ सभागृहात दिमाखदार सोहळा

विद्यालयाच्या कैलासवासी पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ सभागृहात हा कार्यक्रम उत्साहाच्या आणि गंभीर वातावरणात संपन्न झाला.

* मार्गदर्शन: मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती.
* अध्यक्षस्थान: जेष्ठ शिक्षक श्री रामेश्वर कोठुळे,पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे
* प्रमुख पाहुणे: श्री. संतोष अधाने आणि श्री रविंद्र साठे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.
* कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.

प्रमुख वक्त्यांकडून 'विद्वानांच्या सन्माना'चा संदेश

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती शरयू बोरगावकर यांनी केले. यानंतर प्रमुख वक्ते डॉ. रविंद्र साठे यांनी आपल्या ओजस्वी भाषणात डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान समजावून सांगितले. त्यांनी ज्ञानाच्या सर्वोच्च मूल्यावर भर देत स्पष्टपणे प्रतिपादन केले की, "विद्वानाने विद्वानांचा सन्मान करावा." या विचारातूनच समाजात सकारात्मकता आणि ज्ञानाची अखंड परंपरा टिकून राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांचा वक्तृत्व व गीत गायन स्पर्धेत सक्रिय सहभाग

महामानवाच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी आयोजित केलेल्या वक्तृत्व आणि देशभक्तिपर गीत गायन स्पर्धांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

* वक्तृत्व स्पर्धेत आदिती यादव (५ वी 'ब'), सिद्धी जाधव, वनिता साळवे (८ वी 'ब') आणि तनवी दाभाडे (१० वी 'क') यांनी सहभाग घेतला.
* गीत गायन स्पर्धेत ५ वी 'ब' मधील इशिता पवार, राजनंदिनी थोरात व सहकारी, ७ वी 'ब' मधील अनन्या गायकवाड व सहकाऱ्यांनी, तसेच ८ वी 'ब' मधील युवराज सदावर्ते, कार्तिक व सहकाऱ्यांनी सहभाग घेऊन वातावरण भारून टाकले.

आभार प्रदर्शन आणि समारोप

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.८ वी च्या विद्यार्थीनी गीताश्री काकडे आणि सौंदर्या मालकर यांनी केले. अखेरीस, श्री.रामेश्वर कोठुळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले व . त्यानंतर इ.८ वी चा विद्यार्थी सुरज वाबळे याने उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षक वर्ग आणि उत्साहाने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक आभार मानले.व अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## एम. के. देशमुख यांना मातृशोक



गं. भा. नर्मदाबाई किसनराव देशमुख यांचे आज दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अत्ययात्रा शेळगाव आटोळ ता, चिखली जि. बुलडाणा येथे रविवार सकाळी ११.३० वाजता होईल. त्या माजी शिक्षणाधिकारी एम


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ डिसेंबर २०२५

# माती परीक्षणाने कमी खर्चात जास्त उत्पादन



**केसापुरी (प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड) :** केसापुरी तांडा या ठिकाणी मृदा दिन शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिका वाटून साजरा करण्यात आला. अश्विनी पठारे यांनी माती नमुना गोळा करताना कोणकोणती काळजी घ्यावी, आरोग्य पत्रिकेचे वाचन करून पिकनिहाय रासायनिक खत ,जैविक खत, सेंद्रिय खत, हिरवळीचे खते याबाबत सखोल असे मार्गदर्शन केले. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये ताग , धोचा दर दोन वर्षा मिळून एकदा शेतात पेरून फुलोरा अवस्थेमध्ये जमिनती गाडला गेला पाहिजे, जेणेकरून जमिनीमध्ये सेंद्रिय कर्ब, नत्राचे प्रमाण वाढेल, तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे महाविस्तार ए आय अॅपची जन जागृती व त्याचे महत्त्व सांगून शेतकरी यांनी मोबाईल मध्ये डाऊनलोड करण्यास आव्हान केले, त्याचा उपयोग, माती परीक्षण, पिक उत्पादन वाढीचे तंत्र अशा अनेक प्रश्नाची उत्तरे कशी मिळतात हे प्रत्यक्ष मोबाईल मध्ये दाखवून दिले.सहाय्यक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ यांनी महाडीबीटी,गटाचे योजनेबाबत माहिती देऊन राहिलेल्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी कडून घेण्यासंदर्भात आव्हान केले . कृषी मित्र श्री विलास जाधव इतर गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते .

# रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने कर्तत्वान दिव्यांगांचा सत्कार सोहळा संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सर्वसामान्य व्यक्ती पेक्षाही चांगलं काम करण्याची जिद्द ज्यांच्या मनामध्ये असते अशा कर्तत्वान दिव्यांगाचा सत्कार रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने आयोजित करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी रोटरी क्लब मुरूमचे अध्यक्ष प्रा. डॉ.आप्पासाहेब सूर्यवंशी होते. प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य कलया स्वामी,प्रा. डॉ. सुधीर पंचगले, रोटरी क्लबचे सचिव कल्लाप्पा पाटील हे होते.दिव्यांगता म्हणजे मर्यादा नाही; प्रत्येक दिव्यांग व्यक्तीत वेगळे कौशल्य, जिद्द आणि जगण्याची प्रेरणा दडलेली असते. त्यांच्या कमकुवतपणाकडे न पाहता त्यांच्या दिव्यशक्तीची दखल घ्यावी त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन द्यावे असे प्रतिपादन रोटरी क्लब मुरूमचे अध्यक्ष प्रा. डॉ आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले .तीन डिसेंबर या जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग असुन सुध्दा केसाजवळगा येथील सामाजिक काम करणारे पंडित जळकोटे, अंधत्वावर मात करून समाजापुढे आदर्श निर्माण करणारे ज्यांच्याकडे वक्तृत्वही कला आणि सामाजिक भान असणारे बेळंब येथील सहदेव बोडरे, प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूम येथील आदर्श कर्मचारी भीमाशंकर झुरळे , श्री माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम येथील रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. राजकुमार रोहीकर आणि सेवक म्हणून कार्यरत असणारे भुसणी येथील अशोक सुरवसे यांचा रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर अॅडवोकेट डे च्या निमित्ताने मुरूम येथील नामांकित विधीतज्ञ व रोटरी क्लब चे सदस्य अँड उदय वैद्य यांचाही सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन रोटरी क्लबचे सचिव कल्लप्पा पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील राठोड यांनी परिश्रम घेतले. यावेळी गोविंद पाटील ,डॉ. नितीन डागा, डॉ. विजयानंद बिराजदार ,डॉ.महेश स्वामी, शिवकुमार स्वामी ,कमलाकर मोटे ,मल्लिकार्जुन बदोले , बाबासाहेब पाटील, प्रकाश रोडगे आदी मान्यवर उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ डिसेंबर २०२५

## सशस्त्र सेना ध्वज दिन राष्ट्रनिष्ठा, कृतज्ञता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे प्रतीक

७ डिसेंबर हा दिवस भारतात 'सशस्त्र सेना ध्वज दिन' (Armed Forces Flag Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिकतेचा वा परंपरेचा भाग नाही, तर राष्ट्राच्या सुरक्षेसाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या सैनिकांविषयी कृतज्ञता, सन्मान आणि सामाजिक कर्तव्य व्यक्त करण्याचा दिवस आहे. भारत हा विविधतेने नटलेला, भौगोलिक व सांस्कृतिक वैविध्य असलेला राष्ट्रराज्य आहे. अशा देशात राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षेची पायाभरणी सशस्त्र दलांनी केली आहे. या दिवसाचे महत्व केवळ स्टिकर लावण्यापुरते मर्यादित नसून शहीदांच्या कुटुंबियांसाठी, युद्धात जखमी झालेल्या जवानांसाठी आणि सेवेतून निवृत्त झालेल्या सैनिकांसाठी समाजाने जागरूकतेने पुढाकार घेण्याच्या भावनेशी जोडलेले आहे.समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर राष्ट्र आणि सैनिक यांचे नाते हे केवळ संरक्षणाच्या करारावर आधारित नसून सामूहिक भावना, सामाजिक ऐक्य, सामूहिक सुरक्षाबोध आणि परस्पर सन्मान या मूल्यांवर आधारित आहे. सैनिक समाजाला सुरक्षा आणि स्थैर्य प्रदान करतो आणि त्या बदल्यात समाजाने सैनिकाच्या जीवनाला प्रतिष्ठा, समर्थन आणि सामाजिक स्थान देणे ही नैतिक जबाबदारी आहे. समाज, शासन व्यवस्था आणि सैनिक यांच्यातील हे परस्परावलंबी नाते लोकशाही राज्यव्यवस्थेचे मूलतत्त्व ठरते.भारताच्या स्वातंत्र्यानंतर अनेक युद्धे, संघर्ष आणि आंतरिक तसेच बाह्य सुरक्षा धोके भारतीय सैन्याने तोंड देत पार पाडले आहेत. १९४७-४८ मधील पहिले भारत-पाक युद्ध असो, १९६२ चे चीन युद्ध, १९६५ आणि १९७१ चे संघर्ष, १९९९ मधील कारगिल युद्ध किंवा काश्मीरमधील दहशतवादविरोधी कारवाया असो प्रत्येक ठिकाणी भारतीय सैनिकाने अपार शौर्य, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठा प्रदर्शित केली आहे. हे युद्ध केवळ सीमांवरील संघर्ष नव्हते, तर भारतीय मानसिकतेतील स्वाभिमान, स्वतःची ओळख आणि राष्ट्रभक्तीची जडणघडण करणारे ऐतिहासिक क्षण होते. यामुळेच सशस्त्र सेना ध्वज दिन (Armed Forces Flag Day) हा फक्त कर्तव्य नसून भावनिक स्मृती जागविणारा राष्ट्रीय दिवस ठरतो.एका सैनिकाचे जीवन हे सामान्य नागरिकांच्या जीवनापेक्षा खूप वेगळे असते. अनुशासन, कर्तव्यभावना, त्याग, मृत्यूचे सततचे सावट आणि राष्ट्राचे संरक्षण ही त्यांची दिनचर्या असते. हिमालयातील शून्याच्या खालील तापमानात, राजस्थानच्या वाळवंटातील उष्णतेत, पूर्वोत्तर भारतातील दुर्गम जंगलांमध्ये किंवा समुद्राच्या अथांग लाटांवर तैनात राहणारा सैनिक हा राष्ट्राच्या भौगोलिक सीमांचे आणि सार्वभौमत्वाचे प्रत्यक्ष रक्षण करतो. सामाजिक दृष्टिकोनातून तो राष्ट्रीय स्थैर्याचा 'मूक प्रहरी' असतो. आपण समाज म्हणून सुरक्षित आहोत, बाजारपेठा चालू आहेत, शाळा-कॉलेजांमध्ये अभ्यास सुरू आहे, लोकशाही प्रक्रिया निर्भयपणे चालू आहे हे सगळे सैनिकांच्या योगदानामुळे आहे. ही गोष्ट विसरू नये इतकी महत्त्वाची आहे.या दिवसाच्या निमित्ताने सैनिकांच्या कुटुंबीयांचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. सैनिक जेव्हा युद्धात जातो तेव्हा त्याच्याबरोबर त्याचे पालक, पत्नी, मुले आणि कुटुंबिय मानसिक लढाई लढत असतात. त्यांच्यासाठी प्रत्येक दिवस हा आशा आणि अनिश्चिततेचा संग्राम असतो. युद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबांनी अनुभवलेली पोकळी ही केवळ वैयक्तिक नाही तर राष्ट्रीय आहे. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे तर 'त्यागाचे सामाजिक मूल्य' टिकवून ठेवण्यासाठी समाजाने या कुटुंबांना सन्मानाने जगण्यास मदत करणे हा सामाजिक न्यायाचा एक विस्तार आहे.सशस्त्र सेना ध्वज दिन (Armed Forces Flag Day) हा दिवस या मूल्यांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा दिवस आहे.सेवेतून निवृत्त झालेले सैनिक राष्ट्राच्या सामर्थ्याचे महत्त्वाचे घटक असतात. त्यांच्याकडे अनुभव, शिस्त, नेतृत्व आणि प्रबळ राष्ट्रीय मूल्यांची शिदोरी असते. परंतु अनेक सैनिकांना सेवेनंतर नागरी जीवनाशी जुळवून घेणे कठीण जाते. युद्धातील आठवणी, शारीरिक जखमा आणि सामाजिक पुनर्वसन या समस्या अनेक निवृत्त सैनिकांना भेडसावतात. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनासाठी रोजगार, आरोग्यविमा, मानसोपचार समर्थन आणि सामाजिक स्वीकार या गोष्टींची आवश्यकता निर्माण होते.सशस्त्र सेना ध्वज दिन (Armed Forces Flag Day) हा दिवस समाजाला यासाठी सक्रिय भूमिका बजावण्यास प्रेरित करतो.आजचा युद्धाचा संदर्भ बदलत चालला आहे. आधुनिक युद्ध हे केवळ बंदुकींचे नसून तंत्रज्ञानाचे, माहितीचे, सायबर सुरक्षा, अंतराळ संरक्षण आणि गुप्तचर कौशल्ये यांच्या आधारे लढले जाते. त्यामुळे सैन्यदल केवळ युद्धाचे साधन नसून राष्ट्रीय तंत्रज्ञान, संशोधन, संरक्षण उद्योग आणि आत्मनिर्भरतेच्या विकासाचा वाहक ठरत आहे. ही समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले असता राष्ट्राच्या समग्र विकासाचे पाऊल आहे.या दिवसाचे खरे महत्त्व तेव्हाच सिद्ध होते जेव्हा प्रत्येक नागरिक आपल्या जबाबदारीची जाण ठेवून या दिवसाचे महत्त्व मनापासून स्वीकारतो. आजचा दिवस हा केवळ एका दिवसापुरता विचार करण्याचा नाही, तर राष्ट्र म्हणून सैनिकांविषयी आदराची संस्कृती निर्माण करण्याचा दिवस आहे. शाळांमध्ये, माध्यमांमध्ये, समाजात आणि धोरणांमध्ये सैनिकांविषयीची संवेदनशीलता जिवंत ठेवणे अत्यावश्यक आहे.शेवटी सांगावेसे वाटते की सशस्त्र सेना ध्वज दिन (Armed Forces Flag Day) हा दिवस केवळ स्मरणाचा नाही तर संकल्पाचा दिवस आहे. सैनिकांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, समाज म्हणून आपली जबाबदारी ओळखण्याचा आणि राष्ट्रासाठी रक्षणकर्त्यांशी अखंड निष्ठेचा. जोपर्यंत राष्ट्र सैनिकांचे ऋण मानते आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करते तोपर्यंत राष्ट्र सुरक्षित, समर्थ आणि सशक्त राहते. त्यामुळे सशस्त्र सेना ध्वज दिन (Armed Forces Flag Day) हा दिवस राष्ट्रीय चेतनेचे, सामाजिक बांधिलकीचे आणि अभिमानाचे प्रतीक म्हणून सदैव साजरा होत राहावा हीच खरी भारतभक्ती, हीच खरी मानवता आणि हीच खरी राष्ट्रसेवा होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com

## पेरूदादा पेरूदादा

पेरूदादा पेरूदादा
डोकावतोस झाडावरून
राघू मैना खाती
तुला मिटक्या मारून

अंगात घातलास तू
हिरवा हिरवा कोट
शोभून दिसतो
अगडबंब पोट

चव तुझी
आंबट गोड
तिखट मीठ लावून
खातो आम्ही फोड

क जिवनसत्व
तुझ्यात भरपूर
आमचे आजारपण
पळून जाते दूर

तुझ्या पोटात आहे
आयुर्वेदिक खजिना
शरबत, जॅम, जेली
पदार्थ तुझे नाना



**-रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

**प्रतिनिधी नेमणे आहे**
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

## ६ डिसेंबर १९५६ देशासाठी काळा दिवस : डॉ. बाळासाहेब लिहिणार




**छत्रपती संभाजीनगर :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे आज राज्यशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे, तर प्रमुख वक्ते डॉ. बाळासाहेब लिहिणार होते. यावेळी बोलताना डॉ. बाळासाहेब लिहिणार म्हणाले बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरीनिर्वाण झाले, रेडिओतुन ही बातमी पसरताच संपूर्ण भारत देशात शोककळा पसरली फक्त भारतात नाही तर जगात वर्तमान पत्रात पहिली हेडलाईन होती विसाव्या शतकातील महान विद्वानाचे महानिर्वाण. ज्याने भारतातील सर्वात उपेक्षित समाजाला, तेथील स्त्रीला सामानतेचा हक्क मिळवून दिला. शोषित पीडित कष्टकरी समाजाला माणसात बसविले आणि ज्या समाजाला स्वाभिमान काय असतो याची जाणीव नव्हती त्यांच्यात स्वाभिमान रुजविला त्या माणसाचे दुःखद निधन म्हणजे भारत देशासाठी काळा दिवस असे त्यांनी संभोधित केले. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते ते तत्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ,विधीतज्ञ, शिक्षणतज्ञ , समाज शास्त्रज्ञ, या विषयावर त्यांचा गाढा अभ्यास होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक प्रशांत माटे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. गणेश कुऱ्हाडे यांनी केले व आभार डॉ.इम्रान पठाण यांनी मानले. यावेळी प्रा. मनोज देवकर डॉ.कालिदास फड ,डॉ. नरेश डहाळे, डॉ.लक्ष्मण दांडगे , प्रा.लक्ष्मण खरात ,डॉ.सुखदेव पोटदुखे, प्रा.योगेश शिंदे ,प्रा.हरिदास होळकर , श्री प्रसन्न वैद्य, शिवकुमार मुक्तापुरे, कैलास जाधव,श्रीमती अलका कुलकर्णी ,श्रीमती पारेकर, मधुकर राठोड ,ज्ञानेश्वर जाधव इत्यादी कार्यक्रमास उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ डिसेंबर २०२५


## महात्मा फुले विद्यालयात महामानवांना अनोखी मानवंदना




**कन्नड (अरुण थोरात) :** पिशोर येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात दि. २८ नोव्हें थोर समाज सुधारक, स्त्री शिक्षणाचे प्रणेते, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुण्यस्मरण, दि. ०६ डिसेंबर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, दु:खी, पीड़ितांचे उद्धारक, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन व थोर स्वातंत्र्य सेनानी, प्रति सरकारचे नेता क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथि निमित्त स्मृति सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या सोहळ्याचे औचित्य साधून येथील कनिष्ठ महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्रा. जयवंतराव श्रीराम पाटील हयांनी विद्यालयाच्या दर्शनी फलकावर स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमा रेखाटून अनोख्या पद्धतिने या महापुरषांच्या स्मृतिंना विनम्र अभिवादन करून त्यांच्या पवित्र स्मृतिंना ऊजाळा दिला आहे. प्रा. पाटील हे शैक्षणिक वर्षात येणारे सर्व संत, महात्मा, राष्ट्र पुरुष, क्रांतिकारक यांच्या जयंती व पुण्यतिथि तसेच विविध सण, उत्सवानिमित्त फलकावर प्रतिमा रेखाटून उत्सव साजरा करतात. त्यांनी चित्रकलेचे कोणतेही शिक्षण व प्रशिक्षण घेतले नसून केवळ आपला छंद जोपासत आपल्या विद्यार्थी यांना संत, महात्मा, राष्ट्र पुरुष यांचे कार्य व सण, उत्सवातून आपली संस्कृति माहित व्हावी व त्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी चित्र रेखाटून प्रयत्न करीत असतात. या कार्यासाठी विद्यालयाचे संस्था अध्यक्ष के. आर. नवले गुरूजी, प्राचार्य एन. आर. नवले, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, प्राध्यापक वृंद त्यांच्या कलागुणाचे कौतुक करून त्यांना नेहमी प्रोत्साहित करत असतात.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


# सुखनाचा लढाऊ सैनिक : सोपान कोळकर



**सु**खना नदी ही छत्रपती संभाजीनगरातील एक महत्वाची नदी आहे. चौका सारोळा - कोलठाण शिवारातून ती ऊगम पावते. पुढे जालना जिल्हयातील अंबड तालुक्यात साडेसावंगी येथे दुधनाला मिळते. सुखना -दुधना - लहुकी असा त्रिवेणी संगम या भागात पहावयास मिळतो. या नदीकाठच्या गावांचे दोन भाग पडतात. एक ऊगम ते सुखना मध्यम प्रकल्प गारखेडा धरण. तर दुसरा भाग म्हणजे धरणाखालची गावे. याच खालच्या भागात सुखना नदीकाठी वसलेले एक गाव आहे, वाकुळणी हे बदनापूर तालुक्यात येते. वाकुळणी - भायगाव असे ही या परिसरास ओळखले जाते. वाकुळणी व माहेर भायगाव या गावात फक्त सुखना नदी आडवी आहे. वाकुळणी बदनापूर तर माहेर भायगाव अंबड तालुक्यात. तसा हा परिसर म्हणजे अंबड, बदनापूर, पैठण आणि छत्रपती संभाजीनगर अशा चार तालुक्याच्या सीमेवरचा आहे. जालना व छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्हयांना जोडणारा . सीमेवरची गावं असल्यामुळे विकास व परिवर्तनाच्या प्रक्रियेपासून कायम कोसो दूर असलेली. कायम दुष्काळी व अवर्षण प्रवण भाग. आडमार्गी भाग म्हणूनही परिचित. बीड व जालना राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागी असलेला हा भाग आहे. या भागाचा फार काही विकास झालेला नाही. याच सुखना नदीकाठी वाकुळणी या गावात एका सामान्य शेतकरी - शेतमजुर कुटूंबात जन्मलेले सोपान कोळकर हा एक उमदा, जिद्दी व ध्येयवादी युवक. घरची परिस्थिती जेमतेम. वडिल सालगडी म्हणून काम करायचे. अशा प्रतिकुल परिस्थितीत धडपड करणारा एक युवक म्हणूनही त्याची या भागात ओळख आहे. शिक्षण याच गावात झाले. सामाजिक कार्याची त्यास मुळातून आवड आहे. सुखना नदीकाठच्या गावाशी तो याच कारणाने जोडलेला एक हाडाचा सामाजिक कार्यकर्ता ही आहे. छोटे मोठे कामे करून तो धडपडायचा. लॉकडाऊन नंतर सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीची स्थापना मी केल्यानंतर तो या चळवळीशी व माझ्याशी कायम जोडला गेला. वास्तविक माझा व त्यांचा परिचयही नव्हता. कुणाकडून तरी माझा फोन नंबर घेऊन त्यांनी मला त्यावेळी फोन करून तुमच्या सोबत मला काम करावयाचे आहे. अशी ईच्छा त्यांनी व्यक्त केली. तेव्हापासून मी गावाकडे गेलो की तो हमखास भेटायला येतोच. अर्थात भेटीची ओढ व कारणही असते सुखना नदी, शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न, पर्यावरण व निसर्ग संवर्धन. आमच्या या समान आवडीमुळे तो या चळवळीशी जोडला गेला. सध्या तो मुक्त विद्यापीठाच्या पत्रकारितेचा कोर्स चे शिक्षण घेत आहे. अतिशय उत्साही, बोलका, अभ्यासू आणि लेखन वाचनाची त्याला प्रचंड आवड आहे. सामान्य कुटूंबात जन्म झाला, गरिबी अनुभवली, मान अपमान सहन केला. सामान्य माणसांच्या वाटयाला हे जगणं येऊ नये. त्यांचे प्रश्न सोडून त्यांच्या सुखदु:खात सहभागी होऊन त्यांच्या सुखदु:खाचा वाटेकरी व्हावे या हेतूने तो कायम लोकांचे कामे करीत असतो. लोकांच्या मदतीला धाऊन जातो. विविध धार्मिक , सामाजिक कार्यात सहभागी होतो. प्रचंड स्वाभिमानी असलेला हा सोपान बुलंद छावा या संघटनेचा ही एक कार्यकर्ता आहे. सुखना नदीच्या संवर्धनात व नदी विषयक उपक्रमात तो सातत्याने माझ्या सोबत कार्यरत असतो. अधून मधून फोन करून कायम संपर्कात असतो. गावाकडील प्रश्न, वाळू उपसा, अतिक्रमण, पाऊसपाणी, याची माहिती तो मला देत असतो. सुखना नदी हा त्याचा ध्यास आहे. दिवसभरात तो कुठेही असला तरी सुखना नदीवर त्यांच्या दोन चार चकरा दिवस भरात होतातच. नदीप्रेम हे त्याच्यात ओतप्रोत भरलेले आहे. सातत्याने नदी समस्या या विषयी तो लिहितो आवाज उठवितो. आता पर्यंत सुखना नदी संवर्धनासाठी जे जे कार्यक्रम झाले त्यात त्याचा सहभाग लक्षणीय राहिला आहे. गावा शिवारातील युवक, शेतकरी विद्यार्थी यांना तो नदी संवर्धनाचे धडे देतो. नदीशी जोडण्याचे आवाहन करतो. शासन दरबारीही आवाज उठवितो. वाकुळणी - माहेर भायगाव शिवारात त्यांनी सुखना नदी बचाव चळवळ गतिमान केली आहे. केवळ पदासाठी, फायद्यासाठी नाही तर सुखना नदी वाचली पाहिजे हा त्याचा प्रयत्न असतो. त्याच्या वागण्या बोलण्यात कायम सुखना ओतप्रोत ओसंडून वाहते. खरं तर गावोगावी नदी व पर्यावरणावर प्रेम करणारी माणसं, युवक तयार झाली पाहिजे. सोपान कोळकर मला आजच्या युवा पिढीचा नायक वाटतो. उत्तम समज, सामाजिक आकलन, सामाजिक प्रश्नांची जाण व भान असलेला हा ध्येयवादी युवक आहे. ग्रामीण भागात अशा युवकांची खरी गरज आहे. आपल्या चरितार्थासाठी व आवड म्हणून तसेच सामाजिक काम म्हणून त्याने एक रोपवाटिका ही या भागात सुरू केली आहे. शेतकऱ्यांना, युवकांना तो नेहमी मार्गदर्शन करतो. आपल्या मुलांवरही नदी व पर्यावरणाचे संस्कार व्हावेत, ते नदी व निसर्गाशी जोडले जावे हा त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो. दिवाळीला नदीत पणती ठेवून नदीची आठवण ठेवणारा व हा सण साजरा करणारा तो एक सजग नागरिक ही आहे. सध्या एका दैनिकात पत्रकार म्हणूनही तो काम करतो आहे. या माध्यमातून लोकांचे प्रश्न सोडवतो, त्यांचे प्रबोधनही करतो. सोपान कोळकर सुखनाचा एक लढाऊ सैनिक व कार्यकर्ता म्हणून आपल्या सुखना नदीसाठी संघर्ष करीत आहे. गावोगावी अशा ध्येयवादी सामाजिक कार्यकर्त्यांची आज गरज आहे. त्यांचा लोकसंपर्क ही दांडगा आहे. माणसं जपणारा व माणसं जोडणारा हा समाजप्रेमी युवक आहे. त्यांचा जीवन प्रवास खडतर व संघर्षाचा तितकाच कष्टाचा ही आहे. अशाही परिस्थितीत तो आपल्या सुखना मायची सेवा करतो आहे. अजून तो धडपडतो चाचपडतो आहे. कधीतरी त्याला आपला मार्ग सापडेलच. मात्र या वाटेने चालतांना तो सुखनाशी नाते कायम ठेवील असा मला विश्वास आहे. ज्यांना सुखना नदी पहावयाची त्यांनी त्या परिसरात गेल्यावर त्याची भेट आवर्जून घ्यावी.सामाजिक कार्याची त्याला मुळातूनच आवड आहे. समाजकार्य, तसेच विविध सामाजिक संघटनांमध्ये त्यांचा क्रियाशिल सहभाग सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. निसर्ग संवर्धन विशेषत: नद्या संवर्धनासाठी सामाजिक चळवळीत तो सक्रिय आहे.शेतकरी-शेतमजूर तसेच समाजातील उपेक्षितांच्या प्रशांना वाच्या फोडण्यासाठी तो कार्यरत असतो. असा स्वयंसेवी कार्यकर्ता व नदी प्रेमी युवक म्हणून सोपान कोळकर यांचे कार्य लाखमोलाचे आहे. आपल्या या वाटचालीविषयी तो म्हणतो -" माझा जन्म खेड्यातील असल्याने खेड्यातील जनजीवन मी जवळून अनुभवलंय.बापाने गरिबीशी केलेले दोन हात मला माझ्या आयुष्यात संघर्ष कारण्यासाठी बळ देते. या खेड्यातील लोकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या कायमच त्यांच्या पाचवीला पूजलेल्या आहेत.आपला भारत देश कृषी प्रधान आहे परंतु या शेतकऱ्याला समाजात यथोचित सन्मान मिळत नाही. या मातीशी ऋणानुबंध असल्याने मी तिच्या कृतज्ञतासाठी लोकांच्या प्रश्नांचे निस्वार्थ निराकरण करण्यासाठी छोटासा प्रयत्न असताना डॉ.शिवाजी हुसे यांच्या संपर्कात आलो त्यांची चाकोरीच्या बाहेरील समाजसेवा आपल्या जन्मभूमीविषयी असलेली तळमळ पाहून मला आणखीनच प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतूनच मी त्यांच्याशी जोडला गेलो.सुखना नदी हा माझा श्वास व जगण्याचा एक भाग आहे. तिच्या अस्तित्वासाठी मी संघर्ष करीत राहिल. इथूनपुढेही हे कार्य मी अखंडपणे चालू ठेवणार आहे. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती चा मी एक लढाऊ सैनिक आहे. सुखना नदीशी माझे आत्मिक प्रेम आहे. या चळवळीने मला सामाजिक भान दिले. "असे सामाजिक भान असलेले युवक आज आपणास हवे आहेत. युवकांनी त्यांचा आदर्श घ्यावा.सोपान कोळकर यांच्या वाटचालीस व कार्यास खूप खूप शुभेच्छा !


**(संपर्क : सोपान कोळकर ,** वाकुळणी मो.94041 67777 ) –

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**

संस्थापक – अध्यक्ष

सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती.



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002